जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१९/०९/२०२३
## दि.१८/०९/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ९६४/२०२३,भादविक ४२०,४०६,४१९,१७१,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-४७,रा.कोंढवा-खुर्द,पुणे |
| **आरोपीत** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०९/२०२३ रोजी १८/३० वा. कौसरबाग मस्जिद जवळ कोंढवा-खुर्द,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील अनोळखी इसमांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांचे जवळ येवुन,त्यांना आम्ही पोलीस असल्याचे सांगुन,एक ओळखपत्रासारखे असणारे कार्ड फिर्यादीस दाखवुन,त्यांचे सोबत अरबी भाषेत बोलुन,फिर्यादी यांचेकडील चार हजार डॉलर (भारतीय चलनाप्रमाणे ३,२०,०००/- रु) रोख रक्कम तपासणीसाठी मागुन,सदर रक्कम फसवणुक करून घेवुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. शिदे ९४२०००१९९५ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे १९१/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४५ वर्षे,रा.संतनगर,सहकारनगर,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०९/२०२३ रोजी ०५/३० वा. ते ०५/४५ वा.म.न.पा.ब्रीज वरील बस स्टॉप शिवाजीनगर पुणे येथील मनपा-धनकवडी बस मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया मनपा भवन येथील ब्रीजवरील बस स्टॉप येथे त्यांचे राहते घरी जाण्यासाठी मनपा ते धनकवाडीची बस स्टॉपवर येवुन बस मध्ये चढत असताना,त्या दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे डाव्या हातातील सोन्याची पाटली ३०,०००/- रु किमतीची चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. प्रताप साळवे ९५५२५७०७११ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे २४३/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४२ वर्षे,रा.घाटाव,ता.रोहा जि.रायगड |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १८/०९/२०२३ रोजी दुपारी ११/१५ वा.स्वारगेट एस.टी.स्टॅण्ड पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया स्वारगेट एस.टी.स्टॅण्ड पुणे येथे बार्शीला जाणा-या बस मध्ये चढत असताना,त्या दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे जवळील हॅण्डबॅग मध्ये असलेल्या पर्स मधील ३५,०००/- रोख रक्कम व सोन्याची चेन असा एकुण ९५,०००/- रु किमतीचा ऐवज पर्ससह चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, अष्टेकर ८३०४४०२८०० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे २२०/२०२३,भादविक ३८०,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५३,रा.एनआयबीएम रोड,कोंढवा,पुणे |
| **आरोपीत** | दोन अनोळखी महीला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०९/२०२३ रोजी १८/१५ वा.रिचगर्ल एलेगन्ट डिफाईन शॉप नं.७३,ग्राउंड फ्लोअर, क्लोअर सेंटर,कॅम्प,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे रिचगर्ल एलेगन्ट डिफाईन नावाचे शॉप नं.७३,तळमजला,क्लोअर सेंटर,कॅम्प,पुणे येथे कपडयाचे दुकान असुन,यातील नमुद दोन अनोळखी महीला यांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांचे दुकानात कपडे खेरेदी करण्याचे बहाण्याचे येवुन,त्यांचे लक्ष विचलित करून, दुकानातील काऊंटरचे टेबलाखाली ठेवलेली ग्रे कलची पर्स त्यामधील २,००,०००/- रुपये रोख व सोन्याचे दागिने असा एकुण ४,७०,१००/- रूपये किमतीचा ऐवज पर्ससह चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. महेंद्र कांबळे ७२४९००८००८ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**